५६०

म. ग्रं. सं. ठाणे

विषय नाटक

लेखक केळकर म. वि.

सन

संग्रहालय क्रमांक १८७८ ९५५

पुस्तकाचें नांव तारानायकीण

तारानायकीण

५६० - म. वि. केळकर

नाटक

ग्रंथ संग्रहालय
ग्रं.
क्र.

# तारानायकीण.

( कल्पित नाटक. )

हें

पुस्तक.

मालवणयेथें

## महादेव विनायक केळकर.

## यांणीं

तयार करून.

विचारदर्शक छापखा-

न्यांत छापिलें.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आ-
क्टाप्रमाणें रजिष्टर केलें आहे.

सन १८८६

किंमत ७ आणे.

मराठी ग्रंथ सं... नं. ७१८ ठाणें

# प्रस्तावना.

प्रस्तुत वेश्यांचा समुदाय मनस्वी वाढला असून त्या वगा-रजीच्या धंद्यांत पूर्ण वाकबगार झालेल्या दिसतात. यांचीं कारस्थानें विलक्षणतऱ्हेतऱ्हेचीं असूनत्यायोगेंशहाणे लोक हातोहात फसले जातात. त्यामुळें त्यांची शरीर प्रकृति बिघडून शिवाय ते अगदीं पैसा महाग होऊन जातात. अ त्यावकाशांत ज्या बायका अनेक पुरुष भोगणाऱ्या असता त त्यांस उपदंशाचा विकार असावयाचाच. हें बहुतेकांस कळण्या जोगें असून लोक त्यांच्या नादानें त्या विकाराची पर्वा बाळगीत नाहींत. आणि अंतीं अत्यंत दुःखभोगितात. त्याप्रमाणें यांचें कपट पटुत्व न जाणतां यांवर विश्वास ठेऊन हातचा पैसा घालवितात, आणि असें घडलें म्हणजे मग त्यावेश्या यांस अगदीं सोडून देतात. ह्या प्रकारआ-मच्या तरुणांच्या लक्षांत येऊन त्यांस वेश्यांपासून अ-लग राहतां यावें हाच हें नाटक रचण्याचा मुख्य हेतू आहे तो साध्य झाल्यास त्या विषयावर विस्तारें क-रून आणखी एक ग्रंथ तयार करावा असें मनांत आ-हे. सिद्धीस नेणारा परमेश्वर!

ह्या ग्रंथांत क्वचित् रत्नागिरी येथील शूद्रलोकांची भा-

ग्र व लिंगायत वाण्याची महाराष्ट्रभाषा व विशेष मालवण प्रांतांतील शूद्र लोकांची भाषा घातली आहे. ती घालण्याचा हेतू इतकाचकीं इतरत्र लोकास ह्या भाषेचा मासला करून त्यांचें थोडें मनरंजन व्हावें. शिवाय त्यांतील मुख्यनायिका मालवण प्रांतांतील कल्पिली आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

ह्या नाटकांतील मुख्यनायक रघुनाथ राव यानंावा एक सणगांचा दुकानदार होता. त्याची वै ताराबाईच्या नायिकिणीची गांठ पडली तेहां पासून तो अगदीं निकृष्ट स्थितीस पोहोंचून शेवटीं त्यानें तलावामध्यें उडीघालून प्राणघात केला. ही गोष्ट संक्षेपेंकरून यांत आणिली आहे.

त्यांतील गुणग्रहण करून दोषांबद्दल माफी करावी असी माझी नम्रपणानें सज्जनांस विनंती आहे.

ग्रंथकर्ता.

# पात्रें.

सूत्रधार.— नाटकाचार्य.

विदूषक.— त्याचा सोबती.

रघुनाथराव.— एक मणगांचा दुकानदार व नायक.

माधवराव.— रघुनाथरावाचा मित्र व त्याच्यादुकानावरील मुख्य नोकर.

सावित्रीबाई.— रघुनाथरावाची आई.

तारा.— एक नायकिण.

चंद्री.— तिची धाकटी बहीण.

पुतळाजी.— तिची आई.

संगाप्पा.— एक लिंगाईत वाणी.

देवमामंत.— एक सुभांतील शिपाई आणि रत्नागिरी कडील राहणारा.

दिनकरपंत. एक सुभांतील कारकून.

११६

# तारानायकीण.

## कल्पितनाटक.

## प्रवेशपहिला.

### स्थळ.—रघुनाथरावाचें दुकान.

### पात्रें.— रघुनाथराव व माधवराव.

**माधवराव.**—यावें रघुनाथराव, आजपश्चिमे कडे सूर्य उगवला वाटतें. आज बरी बुवा तुला दुकानावर येण्याची इच्छा झाली.

**रघुनाथराव.**—बरें तें असो. मला बोलण्याला अवकाश नाहीं आहे. पांचसातशें रुपये आतां पाहिजे आहेत, दे बरें पाहूं?

**माध०**—आज काय करतोस इतक्या रुपयांचें?

**रघु०**—तें कांहीं तूं पुसूं नये आणि मी सांगूं नये. दे. म्हणजे झालें.

**माध०**—अरे पण गड्या सांगशील कीं, इतक्या रुपयांचें एकदम काम काय तें?

**रघु०**—विचारतोस म्हणून सांगतों. आज आमच्या मित्र

गाव्याकरितां मुंबईहून एक घोड्यांची गाडीमागवावी असें मनांत आहे.

माधo—( रागानें ) बोलावयाला लाज देखील नाहीं वाटत. कितिदां मीं तुला उपदेश केला, पण त्याचा तुझ्या मनाला स्पर्श देखील झाला नाहीं. अरे ह्या रांडांच्या संगतीनें लक्षावधि लोक आजवर नाडलेगेले आहेत. हजारों अन्न महाग झाले आहेत, कितीएकांस फांसावर चढावें लागलें आहे, कितीएक विषखाऊन मरून गेले आहेत, आणि उपदंशाच्या विकारानें हा लोक सोडून कितीगेले याची तर गणतीच नाहीं. दवाखान्यामध्यें जर जाऊन पाहशील तर तुझी खात्री होईल. अशी आणखी अनेक प्रकारें ह्या छंदापासून लोकांची दुर्दशा झालेली आहे. रत्नासारखी तुझी सुंदर बायको असून तुझ्यापासून तिला घडीभर सुख नाहीं. सारा वेळ रडून रडून दिवस काढीत आहे, आणि लशांत ही तिला शिव्यागाळी आणि मारहाण करावयास सोडीत नाहींस. अरे ह्या सटवीची गांठपडण्यापूर्वीं तुझी तिजवर कितीबरें प्रीति होती. तुझ्या आईनें तर ह्या तुझ्या कृतीनें अन्नपाणीही सोडिलें आहे. त्यांची कोणाचीच तुला दयायेत नाहींना? असे त्या अवदसे-

ची प्रीति तुजवर आहे म्हणतोस पण ती पैशां पुरती. आहे. जेव्हां तुजकडून तिला पैसे मिळणार नाहींत; ते व्हां त्या तुला दारांतही नाहीं उभ्या करून घेणार. हें प. क्कें लक्षांत ठेव. आणि पुढें तुला एक पैसाही कोणीवि- कत घेण्यास राजी होणार नाहीं. आणि भीक मागत फिरशील. शिवाय तुलाही उपदंशाचा विकार झाल्यावि ना राहणार नाहीं. तुला पुष्कळ वेळां म्हणतांना ऐकि लें आहेकीं, ती माझ्या शिवाय अन्यपुरुषाकडे क धींही पहाणार नाहीं. तर तुला मी खात्रीनें सांगतों कीं, शेरभर सुतळींतही तुझें नांव येणार नाहीं. ह्या पांचशें रुपयांचे दागिनें जर आपल्या बायकोच्या आं गावर घालशील तर ते पुढें तुझ्याप्रसंगीं उपयोगीप- डतील. अजून तूं पक्का नाडला नाहीं आहेस तोंपर्य- तं माझ्या सांगण्या बद्दल विचार करशील तर त्यां- त तुझें हीत आहे. तुला म्हणजे कोणतीही गोष्ट क- ळत नाहीं असें नाहीं. तूं समंजस आहेस. तथापि दुसऱ्याचें कपट तुझ्या लक्षांत येत नाहीं. म्हणून तूं फसला जातोस. ह्याकरितां पुन्हा तसें न व्हावें असें मी इच्छित आहें.

रघुना०—माधवराव इतका रागावूं नकोस. वेंश्या-

ठगाबाजी, कपट, मूर्खपणा, इत्यादि दुर्गुणांनीं युक्त असतात यांत संदेह नाहीं. तरीपण जिच्यावर इतका मी फिदा होऊन गेलों आहें ती त्या प्रकारची नव्हे इतकेंच केवळ नाहींतर, वेश्यांमध्यें जितके उत्तम गुण पाहिजेत तितके तिजमध्यें आहेत. तिची मजवर प्रीति आहे म्हणून सांगतों तें तुला खोटें वाटतें पण त्याबद्दल मी खात्री करून घेतली आहे. आणि माझी ती समजूत कधींही खोटी ठरणार नाहीं. मागें एकदां माझें डोकें दुखूं लागलें त्यावेळीं तीं मनुष्यें अगदीं कावरी बावरीं झालीं. आतां हे खर्च केलेले पैसे माझ्या उपयोगी पडणार नाहींत असें म्हणतोस तेंही खरें नाहीं. तारा माझ्याकरितां पैसे आणि दागिने खर्चील यांत कांहींच नवल नाहीं. तर ती माझ्यासाठीं प्राणही खर्च करील. असो तुझी समजूत करीत बसण्याला मला आतां अवकाश नाहीं. पैसे दे म्हणजे झालें.

**माध०**—बरें सांग तुला किती रुपये पाहिजेत तें? पांचशें किं सातशें?

**रघु०**—दे सातशें रुपये. (माधवराव सातशें रुपयांच्या नोटा आणून देतात. व रघुनाथराव निघून जातात.)

---

प्रवेश दुसरा.

**स्थळः**-तारानायकिणीचें घर.

**पात्रें**:-रघुनाथराव, तारा, चंद्री, पुतळाजी, देवसावंत.

**पुतळाजी**:-चंद्या, चेडू पेजरवाऊंक गेलांहां तेकाम्ह-णुचां पेजरवाऊन वेगीनये. हे केवांच्यान येऊन बसले हत. ( चंद्री जाते व तारा येते. )

**तारा**:-तुम्हीं केव्हांसे आलेत. मी आतांच पेजरवा-ण्याकरितां गेलें होतें. ( चंद्रीस. ) चंद्या तंबाखु घाल जा. गो. ( आईस. ). आये शेट येईत तर बग हां.

**देवसावंत**:-मी केवांचा हत आलों हाय. पन तुमी झवं आमाला विचाल्लत बी न्हाय. आयली कडे तो रघुना-थराव तुमच्या हतयेवं लागल्या पास्न तुमाला झवं मानु सबी दिस्नास झालय. ते दिवशीं मी झवं हत येऊन बसलों. अन् तो रघुनाथराव आला म्हणून झवं चंद्री बोंब मारित आली. तेवां मला झवं पागच्या दारान् पळू न जावं लागलं. बरं आतां चटकन दरवाजा लावून घे बरें. ( इतक्यांत पुतळाजी रघुनाथराव आले म्हणून सांगते. रघुनाथराव येतोवदेवसावंत पळून जातो.

**रघुनाथराव**.—( देवसावंताला पाहून संतप्त होतो. )

**तारा**.—आज येण्याबरोबर इतकें संताप यला काय झा-लें आहे. तो येऊन बसला होता त्याच साठीं वाटतें?

केवढ्या केवढ्यांची ह्या तारेनें दाद घेतली नाहीं; पण हा शिपुर्डीच मला गोड वाटेल काय? तुमची मला माया ळागली म्हणूनच मी तुमच्या गळ्यांत पडलें. मेलें आमचें बायकांचें मनना! आम्हीं इतर बाजारबसव्यां सारखीं माणसें नव्हे. तुमच्या मनांत असा जेव्हां जेव्हां संशय येतो. त्या दिवशीं तो म्हातारा येथें बसला होता त्यासाठीं देखील तुमच्या मनाला कितीवाईट वाटलें मग जेव्हां तो आमचा बाबा म्हणून सांगितलें तेव्हां थोडीशी समजूत झाली. कोणाच्या घरीं कोणी येऊन बसत नाहींत वाटतें! देवसावंत मलात र बहिणीसमान मानितो. व मीही त्याला भावासमान मानतें.

रघुना०—तर त्याची आणि तुझी ओळख कुठून पडली सांग पाहूं?

तारा.— कांहीं दिवसांपूर्वीं तो आमच्या शेजारीं बिहाड करून राहिला होता. तेव्हां पासून त्याची व आमची ओळख आहे. आतां कधीं आडाकाळीं बारामासीं येतो. त्याला तंवारखू तरी नकोयायला?

रघुना०—असें काय? तुझ्याविषयीं माझी खात्री आहे, पण संशय आला म्हणून मन निर्मळ करून घे-

तरें. मीतीच्या टिकाणीं मनांत कांहीं ठेवूंनये. बरें असो. मी घरीं जाऊन येतों.

**तारा.**—तंबाखू तरी ओटा. (चंद्रीस.) चंद्या तंबाखू घाल गो. (र० रा०) तुह्मी माझ्या करितां घोडयाची गाडी आणवणार अहांनार त्याचें काय इनालें.

**रघुना०**—आमच्या दलालाकडे हुंडी देखील केली. आजपासून आटदिवसांच्या आंत येईल. मी माधवरावाकडे पैसे मागण्याकरितां गेलों होतों त्यानें माझें डोकें उठविलें.

**तारा.**—सरणाचें सरतें आणि कोठवळ्याच्या पोटांत दुखतें. माधवराव कांहीं दुष्टकर्मी नाहींआहे. मागें एकदां तो एका कारकुना बरोबर आमच्या घरीं आला होता. पण त्याला पान देखील नाहींदिलें. त्या दिवसा पासून तो आमचें बरें पाहत नाहीं.

**रघुना०**—(तंबाकू ओटून) तो नसेल तो. माधवरावासापाय कधीं बांकडा पडणारच नाहीं. असा तो मनुष्य आहे. बरें जातों मी आतां. (जातो.)

**पुतळा०**—चेडवा, (तो बामण केसांपासून येऊन बसलोहा. आणि तूं हेका परत परत बसवून घेतस.

**तारा.**—चंद्याक तेकां तंबाखू घालून देऊंक सांग तितक्यांत मी येतंहू.

# प्रवेशतिसरा.

## स्थळ—तारानायकिणीचेंघर.

**पात्रें** रघुनाथराव, तारा, पुतळाजी, चंद्री.

**पुतळा०**—( तारेस. ) चेडवा आज रातीं तो कारकून रवूक येउंचो आसा. तेवां कसा करुंचां गो?

**तारा**—गे तो कारकून कधींतरी येतलो. आणि झेट बारमासचो असा. तेवां तेका कसो दुरववुंचो? आणि दुरववल्यार तेनी आमच्या दारार पायनाय दिल्यान तर काय करुंचां?

**पुतळा०**—गो, तो तुझ्यानादाक आतां वरो लागलोसा. तेवां कायतरी तजेथीजेन चारपैसे मिळयलेतरी वाईट नाय. माका म्हणशील तर असां दिसता तो इलोमगे तुचांत्या मोगज्याथंय गेल्लस असां निमित काढून तेच्या वांगडा तंटोकर. मगे तो रागावोन जातलोंच. असां झाल्यार मातर कारकुनाक घेवूंक नड पडूंची नाय.

**तारा**—वाय होय गे होय. असां केल्यार मात्र कारकुनाक घेवूंक. गावात. आतां चिप रव तूं शेट येवूंचो झालोह्ला. जागो चंद्रा, माळयेर आणि शेट येताकाय वगचारयेंतसून.

**चंद्री**—( माडीवरून जाऊन येऊन. ) आका, येताहसगो येताहा. तेच्यासारोच कोण दिसलो, तोच तो.

**तारा**—( चडफडत ) माकां सांगतां तुज्यार माझो सग ळो जीव आसा, आणि आपण गांवभर सगळ्यांची घरां फिरता. कुसक्यां म्हणनानाय नासक्यां म्हणनानाय. ( इ तक्यांत रघुनाथराव दारावर येतात. ) तीन पोरांचीआ वस झेकां होईशी झाली. खंयसून कायतरी हाडीत आणि माकां धन देईत म्हणून भयदिसता.

**रघुना०**—( आपल्याशींच. ) कायबरें हें! ह्या गोष्टी बहुत करून माझ्याच असतील शा वाटतात. कोणीतरी यांना गप्प झोंकून दिली आहे असें वाटतें आमच्या गांवचे लोक असे कांहीं पाजी आहेत कीं, कांहीं पुसूं च नये. गुलामांना दुसऱ्याचें बरें पाहवतच नाहीं. ( दा-रावर हातमारतो. )

**तारा**—( थाप ऐकून. ) बाय जागे दार उघड. ( पुतळा जी दार उघडते व रघुनाथराव. आंत येऊन खुर्चीवर बसतात. पण कोणी बोलत नाहीं असें पाहून. )

**रघुना०**—( मनांत. ) पकंदरींत मला जो संशय आला तो अगदीं खरा आहे. ( तारेस. ) कायबरें आज हें? म ला येऊन अर्धघटका झाली तरी तूं माझ्याशीं एकशा-

कांही बोलत नाहींस. नित्यशः मी येतांच तूं आनंदीत असतेस. परंतु आज तूं रागांत आहेस. डोळे लालझाले आहेत हें असें कायवरें?

तारा.—बोलायला लाजनाहीं वाटते वाटतां हीं नाटकी भाषणें ऐकून ऐकून माझे कानही बहिरे झाले आहेत. मी तुम्हांला साफ सांगत्येंकीं, तुम्हाला जर मनास वाटेल तसें वागावयाचें असेल तर मला नाहीं आवडावयाचें!

रघुना॰—बरें अगोदर सांग पाहूं, आज इतकी कांरागावेली आहेस तें? माझ्याकडून जर एखादी चूकझाली तर त्याबद्दल तुझ्याजवळ मी क्षमा मागेन तुला माझ्या गळ्याची शपथ आहे, सांग.

तारा—आतां माझें डोकें नका उठवूं उगांच! जिथेंकालसंध्याकाळीं गेला होतां व जिच्या हातचें पान तुम्हांला गोडलागलें, तिथेंच आतां जा कसे. मला पुरे झाली तुमची संगत.

रघुना॰—मी कोणाच्या घरीं गेलोंहोतों, आणि तुला सांगितलें कोणी हें तर सांगशील कीं, नाहीं?

तारा—हां अशा साक्षी पुरवून मी गांवाशीं नाहीं तंटे करीत. " तुझ्यावर माझीप्रीति आहे, तुझ्यावांचून

मला जगांत कोणी प्रीय दिसत नाहीं " असें नेहमींसां गतो आणि तीन पोरांच्या आया आतां बऱ्या वाटूं लागल्या आहेत.

रघुना०— अग तीनपोरांच्या आया कोण? तुझ्यावरमाझी प्रीति नाहीं असें तुला कशावरून समजलें? तुझा मला नाद कितपत आहे हें तुला नाहिंका ठाऊक गेल्यामहिन्यांत भास्करपंताच्या लग्नाकरितां म्हणून बाहेरगांवीं निघून गेलों. पण कोश दोनकोस गेलों नाहीं तोंच तुझा वियोग सहन नहोऊन पुन्हा माघारा आलों. हें तत्व समजून त्यासाटीं लोकांनीं माझी फट फजिती केली. पण तारे सर्वप्रकार मी निमूटपणें सहन केला. हें कशा करितां? तुझ्या करितांना? घटकाभर जर तुला पाहिली नाहीं, तर मला चैन पडत नाहीं. तुझ्यानादानें माझें दुकानावर जाणेंही बंद झालें आहे. सर्वव्यापारं दुसऱ्याच्या हातीं द्यावा लागला. ज्या आईच्या पोटीं जन्म घेतला तिचीही विटंबना मांडिली आहे. जिच्या बरोबर लग्नलाविलें त्या बायकोचें मुखावलोकन नकोसें झालें आहे. हजारांनी रकमा आणून तूं म्हणशील त्यावेळीं तुझ्या हौसी पुरविल्या आहेत. जरमला तूं प्रिय वाटत नाहींस तर इतक्या गोष्टी मजकडू

न घडल्या असत्या काय?

तारा.—कायझालें हजारांनीं रकमा खर्च केल्यात म्हणून. आज कितीदिवस सांगत्यें आहे कीं, मला एक मोत्यांचा कंठा आणून द्या. चिमणीला महिपतरावानें तोंडांतून शब्द काढण्या बरोबर नाहींका करून दिला?

रघुना०.—अग त्यानें तिला अमूक दिलें म्हणून मला सांगूनको. कोल्हापूरच्या महाराजांनीं एकीलादहा गांव दिले ते मला सांगून काय उपयोग? माझ्या शक्तीप्रमाणें मी तुला देईन. कंठा आज नाहिंमिळा लातर उद्यांमिळेल. ह्या बद्दल एवढे दीर्घ प्रयत्न कझाला?

पुतळा०.—(आतून येऊन.) कंठो नाय मेळलोतरीमाझ्या पोशाक खंयसून तरी धनमातर हाडून देशा. असे जडेतडे तुम्हीं काय फिरो नको. तेणा दोघांच्या जिवाची वाटलागात. हेचो पाय कधीं वांकडो पडांचो नाय. हालीं तेच्या जिवाक बरेपणा नायसो झालो हा. पण तां भिडेभाडेन बोलना नाय. तेका सांगलां तू हेच्या नादाक लागोनको. पण तां रांडऱ्यां आईकणा नाय.

रघुना०.—बरें इतका जर माझा तुम्हांला कंटाळा आला असेल तर हा आतां मी निघून जातों.

पुत०—गेलास तर काय पाऊस नाय गेली.

मा०—( पदर धरून. ) तिच्या बरोबर काय तुझी लागलेत आहां. तिला आतां लागलें आहे म्हातारचळ.

रघु०—तुझी मजवर प्रीति आहे हें मला कळतें आहे पण काय करूं, हिणें माझा निरुपाय केला. जातों आतां.

( जातो. )

---

४

# प्रवेश चौथा.

**स्थळ**—रघुनाथरावाच्या घरांतील दिवाणखाना.

**पात्रें**—रघुनाथराव व चंद्री.

रघुना०—( आपल्याशीं. ) काय करावें परमेश्वर म्हणून कांहीं कोणाला सुखी ठेवीत नाहीं. एवढें खरें. जेव्हां मी आल्यापासून माझ्या जिवाला चैन नाहीं. मित्रांजवळ दुःख कथन केल्यानें तें कमी होतें असें म्हणतात, पण हें मी मित्रांस सांगूं लागलों तर हे माझी टर उडवितील. त्यांच्या घरीं मी जावयास लागल्या दिवसा पासून लोक कुटाळ्या करावयास लागले आहेत. पाहूं मुखावलो-कनही त्यांस नकोसें झालें आहे. ( इतक्यांत चंद्रीकडे तिला पाहून. ) चंद्रे कोणीकडे गेली होतीस ?

चंद्री.— तुमच्या कडेंच.

रघुना०— कांबरें?

चंद्री.— आकान तुमकां येऊन जाऊंक सांगित- लांहां. तेचो रातभर डोळ्याक डोळो लागलो नाय. आणि रडोन रडोन वेळ घालयताहा.

रघुना०— (मनांत) हिची तर माझ्यापेक्षांहि वि लक्षण स्थिति झाली आहे. (चंद्रीस) बरें तुझ्या आईचें काय म्हणणें आहे?

चंद्री.— तीय चुरचुरा होली. रागासरसां बोलल य ती झक मारलंय म्हणाहोती. आणि आकानतर तिकां पिडून पिडून रर्वाल्यान तेन्हांलीयरडोंकलागली

रघुना०—(मनांत) ही रागाबरोबर पटकन् बोलून चुकते. आणि मागाहून तिला पश्चाताप होतो. जुनी माणसें इतकीं भोळसर म्हणतात तें कांहीं खोटें न- हीं. (चंद्रीस) बरें तुझ्यामनांत ग कसें आहे?

चंद्री.— मी आपलां रातींच तुमच्या वांड्डा येणा- र होतंश. पण तुमकां इल्लो राग त्यासरसां माकां मारतां म्हणोन भय दिसलो.

रघुना० बाः तुलागकांमारतों असतों. (मनांत) ओहा! काय सर्वमाणसें कोमळ मनाचीआहेतम्ह

णून सांगूं अगदीं भाड्या मारखीच. बरें पण आतां त्यांना दुःखांत ठेवून उपयोगी नाहीं. (चंद्रीस.) चंद्रे जा, मि येतों म्हणून सांगजा.

चंद्री.—तुमकां घेतल्या शिवाय माकां यतं नक्को म्हणून सांगितल्यान ह्या.

रघुना०—ह्या मी येतोंतर : (निघून जातात.)

---

## प्रवेश ७ वा.

**स्थळ**—नायकिणीचें घर.

**पात्रें**—रघुनाथराव, संभाभा, दिनकरपंत, तारा, पुतळाभा, चंद्री.

तारा.—अहो पण आतां एवढें ऐका, शेटकी नाहीं अगदीं येण्याची वेळ झाली आहे. यासाठीं तुम्हीं एकटां जा. उद्यां दिवसाचे या.

संभा०—तुमचे शेट येउंद्यात किं कोनीदि येउंद्यात आमासनी नग तुमची सोबत. मिरच्याअनि हरबर आनून शॅनि द्या.

तारा.—(विचार करून) बरें एकटां तुम्ही जा आणि शेटआल्यावर दोन घटकांनीं या. म्हणजे मी तुमची बाहेरच्या ओट्यावर भेट घेई.

संगा॰— (विचारकरून) बेस हाय पन मी आलोय ही जाग आंतमंदीं तुमासनी कशी समजल.

तारा— अँ: त्यांत काय आहे तुम्ही आपल्या वेळाची घांट येतेवेळीं घेऊन या आणि एकदां वाजवा म्हणजे झालें कीं, चटकन् बाहेर निघून येईन.

संगा॰— बर हाय जातोंतर (जातो व दिनकरपन येतो)

तारा— यावें तुम्हीं आज फार दिवसांनीं दर्शन झालें.

दिनकर॰— तें असो, (हळूच) रघुनाथराव आहेका आंत.

तारा— अजून आला नाहीं. पण त्याची येण्याची वेळ झाली आहे.

दिन॰— जातर त्या म्हातारीला सांग बाहेर बैस म्हणावें त्याला पहात. आणि आलातर चटकन् येऊनसांग.

तारा.— नको आतां ती पिडा इतक्यांत येईल. कायकरावें सगळा दिवस आणि सगळीरात्र इथें एक सारखा पडून असतो. यामुळें तुम्हांस हल्लींच्या हल्लीं किती वेळ परतून जावें लागलें. दमधरा थोड्या दिवसांत त्या

ला कफलक करून सोडत्यें आणि मग देत्यें हाक कून.
पुतळा०— ह्या रानचो तो पारसनितांथंय गाणा आय्कों.
क जाऊंचो आसा. तेन्ना तुम्ही चार घटका रवोंक चा.
तारा.— (आईक) जाईत लय करून. फराळाक तिकडेच
सोतारच्यानी आसा. मग कायतें तेका लवकर मोहणल
नाच्य. (दिनकरपंतास.) या तुम्हीं उद्यां.
दिनक०— बरें आहे येतों तर. (निघून जातो. व नंतर
कांहीं वेळानें रघुनाथराव येतात.)
तारा.— आज किती रात्र आपणाला झाली ही. मी मघां
पासून बाहेर बसून आपली वाट पाहत होतें.
पुतळा०— अगो तेंका जेऊंक खाऊंक कायनको. घ-
टकाभर तो नसले म्हणजे तुजो जीव काय रवणा जाय
आणि तुझ्यापरस त्याचो.
चंद्री.— थाकां झाल्यान अगदीं उघडां उघडां दिसता.
तारा.— आणि आमच्या घरस आमच्या आयेचो. आ-
म्हीं ओंच जिवाक जीव. देऊंनो. हेंका आमची माया-
य आसा.
रघुना०— तारे बा. तुलादेखील हा संशय आहेवा. म
ला तर त्या घरा शिवाय घटकाभर चैन पडत नाहीं.
जेंवीपर्यंत देखील स्वस्थता नसते. अशाची गोष्टीक-

ळत नाहीं. उगाच आपलें पोट भरलें पाहिजे म्हणून कांहीं खातों. आणि जेवण आटोपलें कीं, फक्षणभरही त्याठिकाणीं बसत नाहीं. ( इतकें बोलून रघुनाथराव आणि तारा खोलींत जातात. )

रघुना०— तारे, आज घटकाभर याठिकाणीं नसलों म्हणजे तुमची अशीअवस्था होते. आणि उद्यां मला मुंबईस जावें लागलें म्हणजे मग काय कराल ?

तारा.— मग माझा तर तुमच्या काळजीनें अर्धा जीव होणार. तुम्ही डोळ्यापुढें असलेत म्हणजे मला भूक तहान कांहींच कळत नाहीं. ( इतक्यांत घांटेचा आवाज ऐकूं येतो. )

रघु०—अग, ह्यावेळीं घांट कोणीकडे वाजलीही?

तारा.— बैलाचा वाणी, ( अडखळते. ) नव्हे वाण्याचा बैल आला असेल. कायपण उत्तम योजनाही, घांट गळ्यांत बांधण्याची! अशी मग-ळ्या बैलांच्या गळ्यांत जर घांट असती तर तो दूर असतांच बैल येत आहे असें समजलें असतें आणि दुसऱ्यास सावध राहण्यास ठीक पडतें. म्हणजे अकारणी त्रासभोगावा लागतो तो न लागता.

रघुना०— वाः वाः तारे, तूं अलंकारिक भाषण कर-ण्यामध्यें किती कुशल आहेस म्हणून सांगूं! तुझ्या म्ह-णण्या प्रमाणें जगांत जेवढें म्हणून बैल आहेत त्यांच्या गळ्यांत घांट बांधिली असतां फार मजा होईल यांत शंका नाहीं. अग तुझ्यामध्यें अमुक एक गुण कमी आहे असें मुळींच नाहीं. सुंदर तर आहेस. तारुण्य तर तुझ्या आंगामध्यें मुसमुसतें आहे. या सर्व कारणांमुळें एवढ्या जगांत तूं एक मला प्रीय आ-हेस

**तारा**.— एकूण हे सर्व गुण माझ्यामध्यें आहेत म्ह-णून मजवर प्रीति आहे. तेव्हां ती मजवर आहे अ-सें म्हणण्यापेक्षां गुणांवर आहे असें म्हणणें बरें दिसेल. हे गुण जर माझ्या आंगांत नसते तर माझ्या वर आपली प्रीति नसती।

**रघुना०**— तारे, असें नाहीं. पहा तुझ्यावर माझी प्रीति तर आहेच. परंतु तुजमध्यें ते गुण असल्या-नें तूं मला विशेष प्रिय झाली आहेस. एकंदरींत आज हें नाटकचचालले आहे म्हणावयाचें! जर ना-टकामध्यें तूं शकुंतला व मी दुष्यंत झालों असतों तर कितीबरें मजा उडाली असती?

तारा.— बरें तें असो आतां. माझ्यापसनांतून आप-ल्यास कांहीं सांगावयाचें आहे. मग ऐकावयाचें हो-ईल तर.

रघुना०— प्रिये सांग सांग काय वाटतें?

ता०— पण ऐकणार तर सांगणार.

रघुना०— एवढा तुला संशय!

तारा.— टेवा तर माझ्या गळ्यावर हात.

रघुना०— आतां काय सांगावें हिला! (तिच्या ग-ळ्यावर हात ठेऊन) बरें झालें आतां?

तारा.— कशी ती कळेना पलीकडे नाहीं आज फार भूक लागली आहे मी घरांत जाऊन कांहीं खाऊन येत्यें.

रघुना०— एवढ्या क्षुल्लक गोष्टी करितां गळ्यावर हात कशाला, बरें जा लौकर

तारा.— पण मी गेल्यें म्हणजे तुम्ही निघून जाल.

रघुना०— कायपण आज तुला संशय लागता है-हे! मी रखोत नाहीं जाणार.

तारा.— पण जाल.

रघुना०— तारे तुझ्या गळ्याची शपथ मी जात ना-हीं.

तारा.— पण जाउंद. मी आपली दाराला बाहेरून कडी घालत्ये

मधुना.— घाल पाहिजेतर. तुझ्या मर्जी प्रमाणें कां हो इना!

तारा.— जात्यें झटकर येत्ये हो. (बाहेरून कडी लावून निघून जाते.)

मधुना.— (आपल्याशींच) हि माझी पिथकरीण मला प्राणाहून ही पियवाटते. इथें येण्याची माझी घटकाभर जर वेळ चुकली तर लागलीच मला चिठी पाठविते. तमाच्या नायकांबरोबर नाहीं इतपत शुद्ध वर्तन असत. तारा हें नाव हिला योग्य आहे. जसें द्यावें तसें घ्यावें हीं म्हणकाहीं खोटी नाहीं. हिची माझ्यावर अत्यंत प्रीति आहे, तद्वतच हिज वर माझी ही आहे ह्यांत कांहीं माझ्याकडून आस्त घडतें असे सिद्ध होतनाहीं. आमच्या माधवरावाला अशांच्या संगतीची काय गोडी लागून आहे! वेडा कुठचा! ... केव्हां तुजवर माझी अप्रीति होईल तेव्हां मलाच मी अधम असें मानीन! छेः पण असें कसें होईल! तारे! तुझ्याहातून जरी शेंकडो अन्याय झाले तरी तुजवरची

माझी प्रीति कधी होणार नाहीं. कांहीं तरी खाण्या करितां जाणारें तें काय आणि त्याबद्दल रदबदली ती किती! देवा, तारेमध्यें आणि मजमध्यें कधींहि अंतर पाडूं नको. आज मजसारखा सुखी जगांत कोणीहि मिळणार नाहीं; तारेचें कुटुंब तें माझें कुटुंब असें मी समजतों. आणि कां समजुं नये? तारेच्या घरांतील सर्वच मनुष्यें मला जीव किं प्राण करितात. मी म्हणजे एक त्यांच्या गळ्यांतला ताईतच बनलों आहे! आई आणि दुसरीं माणसें खाऊन रहातील पाहिजे तर! जाइनात का काशियात्रेस निघून! मी कुठें इथें परवा बाळगतों आहें! माझ्या तारेसारखें जर सर्व स्त्रियांचें वर्तन असतें, तर लोक कितीबरें सुखी असते? नशीब बेटयांचें! वेश्यांची संगत करणें हें लोक पाप समजतात. मूर्ख कुठचे! अरे पापाचा परिणाम सुख किं दुःख? दुःखना? मग मीतर पूर्ण सुख अनुभवित आहें! आणि पुण्याचा परिणाम आहे सुख. तेंव्हां वेश्यांच्यासंगती पासून पुण्यप्राप्ति आहे असें कां म्हणूं नये? कदाचित् तें जर पापच असेल तरतारेच्या एकघटकेच्या सहवासा करितां यमाजीपंतांस म्हणावें चं-

द्र सूर्य आहेत तोंपर्यंत मी पाहिजे ती शिक्षाभो गण्यास तयार आहें. बरें अजून तारा कां येत नाहीं? मला नाहीं तिच्याशिवाय चैनपडत! आ-पणच तिकडे जावें म्हणजे झालें. (असें म्हणून बाहेर जाण्याकरितां दार उघडूं लागतो. पण तें उ-घडत नाहीं, इतक्यांत तारा येऊन दार उघड-तें. व दोघेंहि पलंगावर बसतात.)

तारा.—मी बाहेरून कडी घातली नसती तर आपण मला फसवून जातेअसतेत. पण मीच तु म्हांला फसविलें. (रघुनाथरावाच्या तोंडांत विडा घालते) बरें तुमची माझ्यावर प्रीति आहे नव्हे?

रघुना०—यांत काय संशय! मला तूं माझ्या प्राणाहून प्रिय आहेस.

तारा.—तरमग मी आपणाजवळ मोत्यांचा कं ठा करून किती दिवस मागत आहें. पण तो अ-जून मिळत नाहीं. असें कांबरें?

रघुना०—तारे, कांहीं दिवस धीर धर माझी चो-होंकडून सध्या ओढ झाली आहे. म्हणून कंठा मिळण्यास विलंब लागला. ह्यांत तुझ्याकडे मा झेपैसे म्हणजे जास्तगेले असें नाहीं. आजपर्यंत ५।१

हजाराच्या आंत पण मी इथें पडून असतों यामुळें तिकडे माझें नुकसान फार होतें. एकट्या माधवरावाच्या हातून सर्व काम निभावत नाहीं. तो फार जपतो पण काय करूं. इतर सर्व चाकर लोक केवळ लुटारू आहेत. माधवरावाची जरा आडनजर झालीकीं, ते आपलें काम आरंभितात.

तारा:—असें आहे तर त्या लबाड लोकांस दुकानांतून काढून दुसरे ठेवा म्हणजे झालें.

रघुनाथ:—तें सर्व खरें. पण त्यांस काढून परिणाम नाहीं. बाहेर गांवच्या सर्व वसूल करणारे तेच. ते जुनाट असल्यामुळें सगळीं कुळें त्यांस चांगलीं माहीत आहेत. काढून टाकल्यास बाहेरचा वसूल सर्व तेच खाऊन बसतील.

तारा:—तर तुम्ही तरी दुकानावर रहा. म्हणजे दुकानांतील अंधाधुंदी कमी होईल.

रघुनाथ:—हें खरें. मी असल्यापासून आणखी पुष्कळ प्रकारें फायदा आहे. मला जितके ते भितात तितके माधवरावास नाहीं. पण काय करूं, तुझा विरहदुःख फार ही दुःसह झाला आहे. बरें नीज. आतां रात्र फार झाली.

# प्रवेशसहावा.

## स्थळ—तारानायकिणीचेंघर.

पात्रें.— रघुनाथराव, तारा आणि पुतळाजी.

पुतळा०—चेहवा, बऱ्याचादिवसांत रघुनाथ रावाक
ड काय मिळालां नाय. आणि तूंय काय तेची काळ
जी बाळगणस नाय. अगो तूं दोनादिस उमेदवार आ-
नस तवसर काय मिळयसीतां मिळयसी. येणाराकडू
सून तजइजेन पैसे काढूंक होये.

तारा.—अगे तूं काय माकां शिकवुक होयस पण
तेच्याकडे काय असूंक तरी होयांमा? तो झालोहा
वायरेचो गोसांवी. ते रोज तो आपली ओट झालि-
सा म्हणून सांगा होतो. तेच्या घरांत आतां पैसोवि
षय उरलो नाय. वायलेच्या गळ्यांत मंगळसूत्र दे-
खील ठेवल्यान नाय. दुरां गांवांत देखील कोणाचे
च्या उदारेक ‐ र वणा नाय. पाठीं मुडे हाडून दि-
ल्यान तेचे रुपये अजून दिल्यान नाय. तेचो माणूस
येऊन येऊन जाता. माकां झाल्यार तूचो आतां कंटा
ळो इलो देव कधीं एकदां ही पिडा भायरी करीत
सां झालां हा

चंद्री.—गों आका, तुझो शेट येताहा, गो येताहा. गजाली करूंनको. ( इतक्यांत रघुनाथराव येतो.)

तारा.—( रघुनाथरावाचें मुख म्लान पाहून.) आज तुमचा चेहरा कसा उदास दिसतो. असें कां बरें, कांहीं काळजी आहेसें वाटतें ?

रघुनाथ०—काळजीचें कारण पाहिलें तर सूक्ष्म आहे. परंतु आजला तेंच मला कठीण दिसतें.

तारा०—ऐकुं या तरी कायतें ?

रघुना०—मला किं नाहीं, एकहजार रुपयांची गरज आहे. त्याबद्दल आतांच माधवरावानें चिठी पाठविली आहे. हीपहा. (काढून दाखवितो.) मुंबईहून दलालानें मजवर हुंडी केली आहे. तिची भरपाई केली पाहिजे. पुढें काम तूं कर. म्हणजे बाहेरगांवीं कुळांकडे वसूलास मनुष्य पाठवून आठदिवसांचे आंत तुझे रुपये आणून देतों.

तारा.—पण इतकें सांगायला कशाला पाहिजे. ह्या दागिन्यासुद्धां मीच तुमची आहें. मग जें कांहीं माझ्याकडे आहे, तें सर्व आपलें आहे, हें सांगणें कशाला पाहिजे. हजारसोडून पांचहजार जरी पाहिजे झाले तरी चिंता नाहीं पैसे आणि दागिने

हें जर प्रसंगास नाहीं तर यांचा दुसरा उपयोग काय. तीं काहीं खाण्याची कि पिण्याची किंवा दुसऱ्या उपयोगाची वस्तु आहे? बरें हें सर्व असो पण मला जें काहीं फार दिवस आपणाला सांगावयाचें आहे तो योग आज ईश्वरानें आणिला आहे.

रघुना०— काय तें सांगबरें पाहूं?

तारा— तुमचें मन आहे भोळें पण तुमच्या सुदैवानें तुमची व माझी गांठ पडली हें एक बरें झालें. आपलें घराणें इतकें भोळसर आहे म्हणून सांगूं कीं, रायाकेणी हें नांव आम्हांस शोभत सुद्धां नाहीं. ह्या जगांत चांगलीं माणसें फार थोडीं निपजतात. तीं मात्र जिवास जीव देणारीं असतात. दुसऱ्या एखाद्या नायकिणीची आणि तुमची जरगांठ पडली असती तर तुम्हीं अब्रू महाग झालां असतां आणि शेवटीं भिक घेण्याकरितां देखील त्यांकडून एक पैसाहि तुम्हांला मिळाला नसता. आणि शेवटीं डोहांत जाऊन उडीघ्यावी लागली असती.

रघुना०— तूं सांगतेस तितपत ह्या बाईट असतात हें मीपक्कें जाणत आहें. पण तुझ्या सद्गुणांनीं

मला अगदीं विकत घेतलें आहे; यामुळें तुजवर माझी अप्रतिम प्रीति आहे.

तारा.—असें जर आहे तर आणखी एक विचार तें तेवढें सांगा. आपली जी मजवर प्रीति आहे ती वर वर आहे की मनापासून आहे?

रघुना०—हें काय विचारल्येस? वर वर दाखवायाची प्रीति आणि मनांत कपट, अशी गोष्ट माझ्या ठिकाणीं संभवेल तरी कशी? तुझ्याहून प्रिय असें मला जगांत कांहींच दिसत नाहीं. हें तुझ्याही लक्षांत हजारों वेळ येऊन चुकलें असेल पण असें कांबरें म्हणल्येस?

तारा.—खिदमत, माझी खात्री आहेच. पण मी सुद्धां विचारलें आपण असें कराकी, जर माझ्या वर प्रीति आहे, तर तुमच्या हातांतील आंगठ्या आणि कंठी इतके दागिने मला द्या.

रघुना०—प्रीतीची परीक्षा पाहण्याकरितां जर हे दागिने तूं मागत असशील तर आजपर्यंत मी तुला दिलेल्या रकमेपेक्षां हे भारी मोलाचे आहेत असें नाहीं. हे दागिने फारतर हजार दिड हजार रुपयां चे असतील.

**तारा.**— पण प्रीतीची परीक्षा ह्याच दागिन्यांनीं होणार आहे. निर्धन झालेल्यामनुष्यास एवढेच भारी मोलाचे वाटणार आहेत.तर्व्हा शेवटे जर तुम्हीं मनांत कांहीं विषाद नआणिता द्याल तर मात्र प्रीति आहे खचीत।

**रघुना॰**— असें आहे तर देतो पण ह्यापासून आजच गांवांत माझी फार बे अब्रू होईल आंतून जरी कोणत्याही प्रकारेची जिकेरी असली तरी बाहेरून हे दागिनें आमची फार अब्रू राखितात. शिवाय लहानपणापासून मी हे आपल्या आंगावर वापरीत आहें. तेव्हा त्यांचा वियोग मला दुःसह होईल.

**तारा.**— आतांच पहा कसें कबूल झालेत। माझ्यापेक्षां जगांत तुम्हांला कोणतीही वस्तू प्रिय नव्हती. पण हे दागिने मात्र प्रिय आहेत. असें ठरलें नाहिका? मलावाटतें प्रीतीपेक्षां दागिने आणि अब्रू हीं क्षुल्लक आहेत.

**रघुना॰**— बरें कांहोइना। हरिश्चंद्राच्या सत्वाची जशी विश्वामित्र परीक्षा पाहत होता, त्याप्रमाणें माझ्या प्रीतीची परीक्षा पाहण्याचें तूं मनांत आणिलें आहेस. कांहीं चिंता नाही. हे घे दागिने. (काढून देतो.)

तारा.—( आंगच्या हातांत आणि कंठी गळ्यांत घालून.) प्रियकरा, आतां तुम्हांला मी कशी दिसतें?

रघुना०— प्रिये, आतां तूं मला तिलोत्तमेहून ही नरी दिसतेस!

तारा.— आतां मला मांडीवर घ्यावेंतर! आणि मग मी आपणाला घट्टअशी मिठी मारणार।

रघुना०—पण पूर्वी मी सांगतों नसें कर. पारशांच्या मुली प्रमाणें केश पाठीवर मोकळे सोड. आणि आंतल्या कपाटांत माझी जरीकांठी टोपी आहे ती डोकीला घाल.

तारा. बरें (तसें करून मांडीवर बसते, आणि मिठी मारतें.)

रघुना०—(तीस आलिंगून.) सुंदरी ह्या प्रसंगीं तुझें मुखचुंबन किती गोड लागेल? (तसें करितो.)

तारा.—हा प्रकार मात्र कधीं घडला नव्हता!

रघुना०—एका प्राचीन कवीनें एक आर्या केली आहे तिची ह्या प्रसंगीं मला आठवण झाली.

## आर्या.

॥ सुरतं तदेव सुरतं,
॥ कृच्छ्राल्लब्धं यदन्यनारीषु ॥
॥ संतत्यै दाररतिः,
॥ कंडूशमनार्थ चेटिकागमनं ॥१॥

जें अन्यपुरुषांच्या स्त्रियांपाशीं मोठ्या आयासानें प्राप्त झालेलें रूरत तें सुरत म्हणावें. आपल्यास्त्री पाशीं गमन करणें हें केवळ संतती करितां. आणि म नाची तृप्ति होण्याकरितां वेश्यागमनच योग्य होय.

तारा.— तो कवी तुमच्या प्रमाणें ज्यावेळीं रंगेल झाला असेल त्यावेळींच त्यानें ही कविता केली असावी असें वाटतें.

रघुना०—बरें सुंदरी जातों मी आतां. पैशाची मात्र तजवीज करून ठेव. हां?

तारा.— त्याबद्दल काळजी नको.

(रघुनाथराव निघून जातो.)

---

# प्रवेश सातवा.

## स्थळ–रघुनाथरावाचें घर

## पात्रें–रघुनाथराव, माधवराव, सावित्रीबाई

( रघुनाथरावाचें जेवण चाललें-
आहे इतक्यांत माधवराव येतात )

**माधव०**— रघुनाथराव, आपणाशीं कांहीं बोला वें अशा हेतूनें या ठिकाणीं आलों आहे, पण जरतु मची परवानगी असेल तर

**रघुना०**— बोलबोल काय बोलणारतें पण इतके थोडक्यांत सांग की माझें जेवण आटपण्या पूर्वीं तं संपलें पाहिजे

**माधव०**— तें तर मी जाणूनच आहें आणिम्ह णूनच तुझ्या जेवणाच्या वेळीं ह्याठिकाणीं आलो आहे जेवणा शिवाय इतरवेळीं तुझी गांठ पडण्या चा संभवच नाहीं। असो पहा काल एक हजा र रुपयाची मुंबईच्या दलाला कडून हुंडी आलेली आहे आणि तिची मुदत सगळी दोनदिवसांची आ हे कसेंही करून तिचीभरपाई केली पाहिजे का रण तुला चिठी पाठविली होती पण तुझ्या कडू न अजूनही आले नाही इकडून म्हणशील तर

एक पईही मिळण्याचा संभव नाहीं. तुझ्या आई कडे जे कांहीं होतें नव्हतें. तें सारें तू घेऊन गेल्या स भांडून झगडून बायकोच्या आंगावरचे दागिने ही नेलेस. तुझ्या गळ्यांतली कंठी आणि हातातले सले आज कुठें दिसत नाहीत. सर्वच आधार खुंटला आतां कोणाजवळून उसने अगर कर्जरोखे लिहू न देऊन आणावे. तर तसे मिळणार नाहीत! या चें कारण काय म्हणशील तर हल्लीं तुझी कीर्ति चोहींकडे पसरली आहे, ती मुंबईच्या दलाला पर्यंत ही हल्लीं त्याचें ही मन मालपाठविण्यास धजत नाहीं. ज्याकडून हजारो रुपये हात उसने मिळत होते, ते आतां पांच रुपयासही अधीर होतात. आजपर्यंत तुमचे आणि तुमच्या वडिला चे दिवस असूनें गेले तसे यापुढे जाण्याचें चि न्ह नाहीं! चालला आहे असाच प्रकार महिना पंधरा दिवस चालला म्हणजे तुम्हासर्वांस आणि तुमच्या बरोबर मलाही भिक्षामागत देशांतरीं जा वे लागेल. तुझ्यावडिलांनीं मी लहान असतांच म ला आपल्याघरीं ठेविले त्यांच्या पाठीमागें काकू ने ( रघुनाथरावाच्या आईनें ) मला मुला प्रमाणें

पाळिलें आणि तूंही माझें बरें केलेंस. आतां मी म्हातारा होण्याची वेळ आली. आतां निर्वाहाची तजवीज पहायाला कोणीकडे बरें जावें? आणि तुमच्या विपत्तीकाळीं तुम्हांला सोडून गेल्यास आपल्या मनास आणि जनांस कसे बरें वाटेल. मला फार फार आशा होतीकीं, तुझा हा नाद सुटेल आणि तुझ्या कुटुंबास व तुला मी आनंदांत पाहीन. तुझ्याबरोबर एक सुखाचा शब्दही त्यांस दुर्लभझाला आहे. तुझ्या ह्या नादापूर्वी उद्योग धंदा संभाळून आम्हीं सगळीं माणसें कितीबरें आनंदांत होतों? ईश्वरा आतां ते दिवस पुन्हा येण्याची आशा नाहिंना! (कंठ दाटून आल्यामुळें पुढें बोलवेनासें झालें व डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. रघुनाथरावाची आई जवळच होती. ती हा सर्व प्रकार पाहून रडूं लागली. व रघुनाथरावासही फार वाईट वाटलें.)

**रघुना०**—माधवरावनेंअसो गेली गोष्ट फिरून येतनाहीं. तर आतां मी पुढें व्यवस्थेनें वागण्याचें मनांत आणिलें आहे. आतां पैशा विषयीं म्हणशील तर तीही तजवीज केली आहे. (जेवण आटोपून उठतो.)

**माधव०**—या गोष्टी ऐकून कोणाचें बरें मन आनंदी

होणार नाहीं. ईश्वर तुला सुबुद्धि देवो.

**सावित्री०**— (हंसत.) माधवराव, चारचौघांच्या आणि वडिलांच्या पुण्याईनें त्याचें मन पालटो म्हणजे झालें. (रघुनाथराव पोषाक करून निघून जातो.) माधवराव, बरें, तुला आतां पुढें परिणाम बरा होईल असें दिसतें का किं आमचें दुर्दैव पुरें पाठ घेणार आहे?

**माधव०**— काकू तुम्हीं भिऊं नका. मी आपल्या घरांतील कांहीं दागिने, राहतें ठिकाण व घर गहाण ठेवून हजार रुपये तयार केले आहेत. पण ही गोष्ट जर रघुनाथरावाला सांगतों असतों तर तो निष्काळजी राहाता. आणि थोड्याच दिवसांनीं प्रसंग फार वाईट येता असता. म्हणून मी त्याजवळ ती गोष्ट बोललों नाहीं. त्या रांडे कडून आपणाला पैसे मिळतील अशी रघुनाथरावाला फार फार आशा आहे. आणि त्याच धिरावर रुपयांची काळजी करूं नको असें त्याणें मला सांगितलें आहे. पण हा तिच्याकडे मागण्याकरितां गेला म्हणजे तिच्याकडून एक पै सुद्धां याला मिळणार नाहीं, हें मी जाणून आहें आणि तसें झालें म्हणजे बऱ्याच अंशांनीं याचा नाद सुटण्याचा संभव आहे. तेवढीपर

परमेश्वरानें कृपा केली तर मग आणखी काय पाहिजे तो करच आपले पहिले दिवस पुन्हा येतील निरुत्साह होऊन तिकडून तो आला म्हणजे पैसे दाखवून त्याला धीर आणीन आणि चार बोधाच्या गोष्टी सांगेन मग त्याचा तो नाद अगदीं जरी कमी झाला नाहीं तरी सारा दिवस तो तिथें पडून राहणार नाहीं. आपला उद्योग पाहूं लागेल. असें झालें म्हणजे आणखी काय पाहिजे आहे थोड्याच दिवसांत व्यवस्था लागेल.

**सावित्री०—** माधवराव, तुमच्या तोंडांत साखर पडो. परमेश्वर कृपेनें तुम्हीं सांगतां असें घडलें म्हणजे आमच्या आनंदास पार नाहिंसा होईल. तुमचे मात्र आम्हांवर फार फार उपकार आहेत. ते परमेश्वर कृपेनें कधीं फिटतील तेव्हां फिटतील.

**माधव०—** तें सोडा, त्यांत उपकार ते कसचे? मी आपल्या कर्तव्यापेक्षां कांहींच ज्यास्त केलें नाहीं मात्र तो सुदीन लौकर येवो म्हणजे झालें. बरें आतां मी दुकानावर जातों. रघुनाथराव जर दुकानावर न येतां परस्पर इकडे आला, तर मीं भेटावयास सांगितें आहे असें सांगून तिकडे पाठवून द्या.

**सावि०—** बरें आहे तसें करितों. ( माधवराव निघू

न जातो.)

---

# प्रवेश आठवा.

## स्थळ.— तारेचें घर.

**पात्रें.**—रघुनाथराव, तारा आणि पुतळाजी.

**पुतळा०**—काल तेच्या कडसून तितको इत्रय काढशी असो काय दिसानाय. पण आतां तूं पुरो झालस खचीत! माझानाव जागयरशी.

**तारा.**— तुझो नांव कसलो पोटांतलो पाणी हाल त्याशिवाय काढुंचो तर तेची तारीफ. तेच्याकडे शिलकीक सगळो तितक्यांच होतो. तिजक्यां पडलोंच पदरांत. मी इतक्यांत उतावळो जातंय नाय. पण तो जेवां उलटो हजार रुपये मागोंक लागलो तेवां तेवो समजलो अजमाल. बरो आतां असो सांग तो रुपये मागोंक लागलो म्हणजे तेका काय सांगोंचो.

**पुतळा०**— सांगतलस गो काय, तो आतां आमका हयो कित्यांक? खयसुन तरी पैसो भर मिळतलो तो हेच्यापासून नायसो जातां. तेवां आतां कायतरी निमित काढून तेका आतां भायरो करूंक हयोच. मग

आयतां तो पैसे मागता ह्यांच निमित. काय वाईट.

तारा.— अगे, तां खरां पण असलां निमित करां दिसात.

पुतळा०— अगो, आतां तेचां कसलां काय तेकां परत आपल्या घरा घेउंचो असलो आणिक तेच्याकड सूनचार पैसे मिळती असे असले तर निमित चोकट हयां. आतां काय चार गाळी घातल्यो आणि परत दारावर पायटेयशी तर मोडून घालोन म्हणूनसांगलां म्हणजे झालां.

तारा.— अगे, पण असांकस्लंक काळीज थोर कस्लंक हयां. माझ्या हातांसून कायतां जाऊंचां नाय.

पुतळा०— अगो, असां अगदों गळसांडतस काय काळीज जरा घट्टकर, आणि मोग्याक देउंक हेतूं तजइजेन आमच्याकडसून पैसे काटतहस, असां निमितकरून तंटोकर, आणि तोंना ढवून गाळी घालूंक लाग. शेवटाक लात मारून भायेर घालव. म्हणजे झालां. इतक्यां केलस मगे तोकाय दारार परत पाय ठेवुंचो नाय. तोकाय हेरां सारो निमको नाय. आसा.

तारा.— अगे पण तूं म्हणतस तसां केलांतर तेणाटें

मराठी ग्रंथ ... पुणे.

व आमचा बरा करूंक ह्यो मा.

**पुतळा०**—तूं तर अगदींच खुळी आगो आमचो धरम, काय असा तो अजुनय तुका ठावूक नाय. एकादो गिरस्त आपल्या नादाक लागलो म्हणजे तेच्याकडे असतीत तितके नजइजीनें पैसे काढून घेउंचे. आणि शोवटाक लात मारून घालवूंन देऊं-चो. असां केलां तर देव ह्याधंद्यांत बरकत देता आ-णि मेल्यार मुक्ति देता.

**तारा**—बरां पण तेणा रागावोन माकां मारल्यान तर मग काय करूं ?

**पुतळा०**—मारल्यान तर आपण बोब मारून दे-उंची मग शेजारलोक जमले मगे माकां उगिच्या उगि-च मारता म्हणून सांगोंचां. तांय लोकांक खरांना-च वाटलांतर तेणा दारूनायतर अफू कायतरी खा-ल्यान हा, आणि मस्तीकरता म्हणूंन सांगोंचां मग तेकां छी थू करून लोकच भायेर काढतो

**तारा**—बरां आसा आजचो तुझो उपदेश माझ्या मनार चांगलो उठलो. आतां तूं काय काळजी करूं नको. (कांहीं वेळानें रघुनाथराव येतात. व खुर्ची वर बसतात पण कोणी बोलत-नाहींसें पाहून.)

रघुना०—( मनात ) कायबरें हें! आज चिन्हकां हीं निराळें आहे. हीं सर्वच माणसें आज रागांत असल्या सारखीं आहेत पुन्हां मजबद्दल कांहींत-री कागाळी यांस कोणीं सांगितली, असें वाटतें हीं मनुष्ये अगदीं भोळसर आहेत ह्मणून हीं को णीं कांहीं सांगितलें तरी खरें मानतात. अंतःक पटी आणि निष्कपटी दोन्ही तऱ्हेचीं माणसें एक त्र असल्यामुळें निष्कपटी माणसांची जी कांहीं धांदल उडते ती पुसूंच नये आह्मां सर्वांची यावे ळीं तशी स्थिति झालेली आहे. ( तारेस ) मला ये ऊन कितीवेळ झाला परंतु मजकडे पाहण्याचें देखी ल आज तुह्मास कठीण झालें आहे दुःशासनाचा प्राण घेतेवेळीं त्याच्या मागील अपराध आठवून भी मसेनाची जशी स्थिति झाली होती त्याप्रमाणें आ ज तुमची स्थिति झाली आहे. तारे सांगपाहू मजव र आज इतका तुमचा रोष कां झाला आहे तो?

तारा:— आमीष दाखवून मासाचा कोळी जसाघा त करितो त्याप्रमाणें आमचा घातकरण्याची ज्याणें इच्छा केली आहे त्याच्याशीं समजून उमजून पुन्हा गोड बोलावें असें कोण ह्मणेल

रघुना०— ( कपाळास हातलावून ) हाय हाय रे दे वा विपरीत झालेस म्हणजे किती पिडा देतेस तुझ्या पुढें मोठ्यामोठ्यांचेही यत्न ठकतात खुंटीनें हार नि कळत जाऊन विक्रमावर जसा वृथा आरोप आला त्याप्रमाणें व्यर्थ मजवर आरोप येतआहे

तारा — ( संतापून ) बोलणें ऐका ! केवळ साधुच आपणाला जशी काय माहितीच नाहीं अरे लुच्चा कसा, अरे जो दुसऱ्यास ठकविण्याची इच्छा करितो त्याचें परमेश्वर कधींही बरें पहात नाहीं मूढा हें तत्व अजून तुला समजू नयेना । अरे म नुष्यांजवळ आणि त्यांतून आमच्या सारख्या ना ळस्तर बायकांकडे तुझे ठगाबाजीचे धंदे चालतील पण ईश्वर सर्व साक्ष आहे हें तूं कसें जाणत नाहींस

रघुना०— ( रडूं लागतो ) तारे, तारे, अग असाम- जकडून काय अन्याय घडला तें तरी कृपाकरून सांग. कोणी दुष्टानें तुला काय सांगितलें तें जर म ला सांगशील तर तुझ्यासंशयाची फेड मी करीन तुझे बोल आजवर किती मऊ होते ते आज इत के कठीण झाले कीं, माझ्या ह्या हृदयावर बाणा-

प्रमाणें टोंचतात.

तारा.— अरे अधमा, ज्या गाईनें आजपर्यंत तुझ्यावर विश्वास ठेविला होता तिच्या मानेवर सुरी ठेवण्याची इच्छा धरितोस. अरे मला कोण काय सांगणार! तुझी कृतीच सर्व सांगते. अरे तुजजवळ पैसे नाहीं असें नाहीं, पण माझ्याकडून निघतील तितकेच काढून त्या रांडेच्या पदरांत टाकावयाचें व मला भीक मागत देशांतरीं पाठवावयाचें असा मनांत इरादा धरून त्याप्रमाणें तिजजवळ तूं प्रतिज्ञाही केली आहेस. ही गोष्ट जर आज बाहेर न फुटती तर थोड्याच दिवसांत तुझी इच्छा साधली असती.

रघुना०— तारे, नाहीं ग नाहीं. जिच्याबद्दल तुला आज फार दिवसांपासून संशय आहे, तिची माझी चांगली ओळखही नाहीं. ती मला आई समान आहे. माझ्याकडे म्हणशी तर आज तुझ्या प्राणाची शपथ, एक पैसाही नाहीं. युक्तीनें तुझ्याकडचा सर्व पैसा काढावा आणि त्या रांडेस द्यावा ही गोष्ट मी स्वप्नांत सुद्धां आणिली नाहीं. तेव्हां ही अगदीं खोटी गोष्ट ज्याणें तुला सांगितली अ-

सेल. त्याचें मला नांव सांग. म्हणजे यांत कांहीं खरेपणा नाहीं अशी मी तुझी खात्री करून देतों.

**तारा.**— मला नको आहे तुझी खात्री। मी असल्या ह्या पाजी माणसा सारखीं मायबहिणीशीं तंटा कधींही नाहीं करणार. ती रांड तुझ्या आईसमान काय चांडाळा हें पापतरी आपल्या माथीं करून घेऊं नको. आई बहिणी म्हणून त्यांच्याकडे नीच कर्म करितांना तुझ्या मनाला कांहींच का वाटत नाहीं.

**रघुना०**— तारे, नको ग नको! हे भलभलते आरोप मजवर आणूं नको. तारे आतां मी अगदीं दीन झालों आहें. माझी तुला कांहींच का दया येतनाहीं. तुझ्या ह्या निष्ठुर भाषणानें माझे प्राण कासावीस होत आहेत.

**तारा.**— माझ्याही मनांत तेंच आहे. केव्हां हात उरावर घेऊन चौघांच्या खांद्यावरून जाशील. आणि मी डोळ्यांनीं पाहीन असें मला झालें आहे. तूं जिवंत राहून काय उपयोगाचा. उगाच भुईला भार मात्र. तुझ्यासारखे लोक जगांतून जेवढे जेवढे कमी होतील तेवढी तेवढी जगांतील ठका-

बाजी मुळींच नाहींशी होईल

रघुना०— आतां काय करूं! परमेश्वरा तूंहीमज-
वर कोपयुक्त झालास ना? तारे, पुढें तुला मी ठ-
कावणार होतें असें तुला कोणीं सांगितलें तेव-
ढ्यावरून मला तूं ठक म्हणत्येस पण आजप-
र्यंत मीं तुला ठकविलें नाहींना? ह्याऱ्याच पद
रचे हजारों रुपये खर्च होऊन मी अगदीं कफ
ल्लक बनलों आहें.

तारा.— तूं मला काय ठकवितोस आणि तु-
झ्याकडून मी ठकवून घेतें कुठें? हजारों हजारों
ते तुला जास्त वाटत असतील पण मला नाहीं
जास्त वाटत!

रघुना०— तारे मला देखील नाहीं ते जास्त वा-
टत. पण आज विनाकारण जो मजवर कोप करून
शब्दांचा वर्षाव केलास तेणें करून माझें चित्त
अगदीं विरघळून गेलें आहे. तारे तुझ्या मनांती
ल संशय फेडून टाकिला तर त्या तुझ्या भिथक
नावर पूर्वी प्रमाणें प्रीति करिशील ना?

तारा.—पूरर्वा, हा अजुनही तुला संशय आहेना?
तर आतां सांगतें हें ऐक. आजपासून तूं मा—

झा खरा दुष्ट बनला आहेस. यानंतर तुझें मला मुखा-वलोकनहीं नको आहे. तर आतां राहिलेली आपली अ-ब्रू घेऊन माझ्या घरांतून चालता हो. आणि आज पासू-न माझ्या दारांतहि पाय ठेवूं नकोस.

**रघुना०**—(रडत रडत) तारे, अग तुझ्या नादानें मी अ-गदीं मूर्ख होऊन चुकलों आहें. माझी योग्यता सर्व बा-जूस सोडून दिली आहे. हें तुझ्या लक्षांत येऊन चुकलें च असेल. इतकेंहि करून यानंतर जर तूं मला घरांत न घेशील तर मलाखरोखर वीष खाऊन मरावें ला-गणार आहे

**तारा**—विष खा किंवा समुद्रांत उडी टाकून मर. पा-हिजे तसें कर. पण आतां बऱ्या बोलीनें माझ्या घरांतू-न चालता हो. नाहितर लाथ मारून बाहेर घालीन.

**रघुना०**—तारे, अग आज तूं किती निर्दय झालीस हीं. पूर्वीचें जें तुझें मन तेंच नाहें. तारे, नकोस नको सांइया प्राणावर उदार होऊं नकोस. आणि दया क-रून माझे सर्व अन्याय विसर.

**तारा**—गाढवा, मला दया येण्याकरितां कितीजरी आर्जव युक्त भाषणें केलीस तरी तुझी मला दया येणार नाहीं. पण मी मूर्खा सारखी काय बोलत ब-

सलें आहे. मामोपचाराच्या गोष्टीनें तूं सोईनर कधीं ही येणार नाहींस तुला खेंचुनच काढला पाहिजे. ( हातास धरून ओढते.) निघ मूर्खा. पडदारा बाहेर.

**रघुना०—** तारे, अग जरा धीर धर. मी सांगतों तेवढें ऐक. आतां मी जिवाची पर्वा बाळगीत नाहीं. पण कृपाकरून मला लोकांच्या ऋणांत ठेवूं नको. काळ-की माझी कंठी आणि सल्ले तेवढे गहाण ठेवून हजार रुपये आणून दे किंवा तुजकडे ते दागिने आणून दे म्हणजे मी गहाण ठेवून अगर विकून ऋणांतून मुक्त होतों

**तारा.—** ( संतापून.) हरामखोरा, कंठी आणि सल्ले मजकडे ठेव टेविली आहेस काय? साधुपणाचा डौल घालून ठकवूंप हातोस त्या दागिन्याकडे तुझा काय हक्क आहे? आतां तुला मी एवढें सांगतें कीं कोणत्याही प्रकारची वटवट न लाविता सोईनें निघून जा.

**रघुना०—** नको ग नको अशी निष्ठुर होऊं नको आज पर्यंत तूं...........

**तारा.—** असा तूं सोईनें जाणार नाहींस ( रदबून बाहेर काढते व मागाहून लाथ मारते.) निघ पाजीमा-

गला. आज पासून दाराच्या आंत पाय ठेवशील त
र पहा काय होईल तें. ( रघुनाथराव डोळ्यांतील
आस्वें पदरानें पुशित पुशित निघून जातो. )

---

# प्रवेश नववा.

## स्थळ—डोंगरावरील तलाव.

## पात्रें—रघुनाथराव.

रघुना०— हा मी आपल्या इच्छित स्थळीं येऊन पोंचलों काय चमत्कार आहे! पूर्वी जो प्रदेश मला आनंदवीत असे, तो आज भयंकर दिसत आहे सूर्य अस्तास जाण्याचा समय असल्यामुळें त्याचे किरण आतां किती कोमल झाले आहेत. वारा झुळझुळ वाहून किती आनंद देत आहे हा डोंगर दोन प्रहरच्या वेळीं तापऊन म्हणजे पार्थस्थांस प्रळयाग्नीच्या ज्वाळे प्रमाणें ताप कारक होतो पण तोच यावेळीं नेत्रांस पहा किती रमणीय दिसत आहे तलावाचें पाणी जाण्याच्या मार्गावर जारकें पोफळी इत्यादि झाडें लागून हिरण्यागार वृक्षांची एक कशी एक रांग दिसते आहे वायुच्या योगें केळ्.न.

ह्या पाण्यावर लाटें मारीत आहेत तीं एक पळत आहे व दुसरें त्याच्या मागें लागलें आहे असें दिसतें. एकं दरींत ह्यावेळीं हवा खाणाऱ्यालोकांस हें स्थळ किती मौजेचें आहे, पण ह्या हतभाग्यास हें सगळें विपरीत भासत आहे. हा सूर्य, हीं झाडें झुडपें वगैरे सर्व कांहीं फिरून माझ्या नजरेस पडण्याचा संभवच नाहीं. माझे मित्र आई वगैरे आणि माझा परममित्र माधवराव हींच माझीं ह्या जगांत प्रीति पात्रें होतीं पण अलीकडे वर्ष दिडवर्ष ह्या सर्वांस एके बाजूस करून तारा व तिच्या घरचीं माणसें हींच मीं आप्त मानिलीं तेणें करून जें माझें नुकसान झालें व होत आहे तें फिरून भरून येण्याचा संभवच नाहीं. वास्तविक पहातां तारा आपणास अनुरक्त ह्यासाठीं मला प्राणहानी करण्याची जरूर नव्हती कारण त्यांची मजवर उरगळीच प्रीति नव्हती. पण नादाचें स्वरूप किती भयंकर आहे पहा इतकें करूनही त्याचा वियोग मला दुःसह झाला आणि मी जीव देण्यास तयार झालों आहें. माझ्या मित्रांनीं आणि विशेषतः माधवरावानें जो मला उपदेश केला तो मी ऐकतों असतों तर आ-

ज असा प्रसंग मजवर अगदीं येताना. माझ्याप
ठीमागें माझी आई आणि माझी खरी प्रियक
रीण ह्यांची कायवरें अवस्था होईल. मीं दुष्टानें
तारेचा नाद लागल्या दिवसा पासून एक दिवस दे
खील त्यांना सूख म्हणून दिलें नाहीं आणि आ
तां मरून त्यांचा दाव साधीत आहें. माझा प्रिय
कर मित्र माधवरावही खरोखर रडून रडून अ
कांत करील. मित्राचा संबंध बाजूस ठेविला तर
त्यानें आजपर्यंत जी माझी इमानें इतबारें चाक
री केली, त्याचा मोबदलाही त्यास मजकडून मि
ळाला नाहीं. मुंबईच्या दलालानें आजपर्यंत जे
आम्हांवर उपकार केले त्याचे उपकार हजार रुप
ये बुडवून फेडिले नारायणा! अखेरीस मला
त्यांच्या ऋणांत ठेविलेंसना? आणि जगलों म्ह
णून तरी त्याचे रुपये आतां माझ्या हातून कसे
फिटणार आहेत! लोकांपासून दिवाळखोर म्हणू
न घ्यावें, त्यापेक्षां मरून जावें हेंच वरें. तारेच्या
नादासोचे फळ हें, आपणाला मिळत आहे. प
रा अबाव आज हें पाहिल्यानें मिळालें असें नाहीं
हजारों लोक ह्या मार्गानें गेले आहेत व पुढेंहि जा

नीघ

## श्लोक.

॥ गांजाओढुंनकोसुरापिउंनकोभूंभांगघोटूंनको ॥
॥ गोळीखाउंनकोअफूशिवुंनकोमाजूमसेवूंनको ॥
॥ कांहीचोरुनकोउगांफिरुंनको वेश्येशिपाहूं नको ॥
॥ विद्याज्ञान धना सदा मिळविल्या वांचून राहूंनको ॥ १ ॥

अशा प्रकारें शेंकडों लोकांनीं उपदेश केले पण ऐकतो कोण? पण जे ऐकत नाहींत त्यांस त्या बद्दल पुढें शिक्षा मिळाल्या वांचून राहत नाहीं. म- ला जें आज शासन मिळत आहे याचेंही कारण तेच होय. आणि माझ्याप्राणसखीसवेळोवेळीं झाले ला संताप माझा या रीतीनें परिणाम करीत आ- हे. खरोखर तिच्या शापाचेंच फळ हें. माझें शे वट पर्यंतचें चरित्र जर कोणी लिहून ठेवील अगर त्या विषयावर एकादें नाटकाचें पुस्तक रचील तर तें फंदी लोकांच्या बरेंच उपयोगी पडेल. मला लो- क शहाणा धूर्त, चतूर असें म्हणत असत. पण ता- नें मला अनेक वेळां टकविलें तरी तें माझ्या त्या वेळीं लक्षांत येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय? बरें असा विचार करीत बसण्याची ही वेळ नव्हे जों

पर्यंत या ठिकाणीं कोणीआला नाहीं तों पर्यंत आपलें काम साधून घेतलें पाहिजे बरे पण मला पोहतां येतें हें अशा प्रसंगीं फार वाईट नजाणों कदाचित आंत उडी टाकिल्यावर जगावें. अशी इच्छा होणार नाही कशा वरून? तेंव्हां आपण एक गळ्यांत बराच मोठा दगड बांधावा म्हणजे झालें काम. हो खाशी युक्ति सुचली, पण गळ्यांत दगड बांधण्याला साधन काय? एकादी दोरी पाहिजे पाहिजे होती. ती याठिकाणीं एकादी सांपडेल तर बरें होईल (चोहोंकडे पाहून.) नाहीं कुठें दोरी आढळत. आतां आपण आंगावरील धोतर एकेरी करून दोरीच्या ऐवजीं उपयोगांत आणावें (तसें करितो) शेवटीं माझा सोबती हाच (दगड) इतर सर्व मनुष्यें आता घराकडे राहिलीं असतील पण हा मात्र बरोबर चालला. सज्जनाचे उपदेशाकडे जो दुर्लक्ष करितो त्यास अशा प्रकारची कांहीं तरी शिक्षा होतेच होते राज शिक्षेपेक्षा ही कमी आहे असें नाहीं सरकारी अधिकाऱ्यांची नजर चुकली तर त्यांचा कायदा अमान्य करणारांची शिक्षा राजा करून चुकते

पण ह्यांचा कायदा अमान्य करणारांची शिक्षा चुकावयाची म्हणून नाहीं. बरें. आतां अवधी उपयोगी नाहीं. ( दगडाकडे पाहून ) ह्यास बांधावे गळ्यांत. ( तसें करितो. ) देवा। वेश्यांच्या संगती पासून लोकांनीं अलग राहावें असें तरी कर किंवा त्यांची तरी बुद्धि पालट आणि यानंतर असा प्रसंग कोणावर येऊं देऊं नकोस. असें तुजजवळ माझें सांगणें आहे. ( तळ्याच्या कांठावर उभा राहतो. ) गंगे आतां मला आपल्या उदरांत घे! जलचरांनों, हा माझा देह भक्षण करून सार्थकीं लावा। परमेश्वरा। शेवटीं आतां तुज जवळ माझें इतकेंच मागणें आहे कीं, मागच्या व ह्या जन्मींजें मजकडून पाप घडलें असेल त्यांतून मला कृपा करून मुक्त कर। आणि माझ्या माधवरावाला व कुटुंबांतील मनुष्यांस सुखी राख. देवा शेवटीं तुला मी अनन्य भावें करून वंदन करितों. ( उडी टाकतो व मृत्यु पावतो. )

---

# प्रवेश दहावा.

स्थळ— रंगभूमी

पात्रें— सूत्रधार व विदुषक.

विदुषक :— साकी.

अनादिकालापासुनि ज्यांणीं, झिजउनि अपुली काया ॥ परांसुखविलें त्या- अबलांसी दूषिसि कां अन्याया ॥ कां तद्दोषा घेसी ॥ कां तूं मत्त असा होसी ॥

जेणें करून स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साध तात, अशा भारत भागवतादि ईश्वराच्या लीलांना एकरूपानें दाखविण्याचें सोडून भलभलतीं नाट- कें करीत बसलास! अरे अबलांवर शस्त्र धरण्या- त पुरुषार्थ तो कोणता? धिःकार असो डूक अ- णि तुझ्या नाटकाला!

सूत्रधार— मित्रा अरे आज अकारणी तुझा

मजवर क्षोभ झाला, तेणें करून मला फार वा-
ईट वाटतें

**हिंदु०**— पुन्हा अकारणी म्हणतोस ? अरे ज्यां मध्यें महानंदे सारखीं रत्नें निपजून गेलीं त्यास सरसकट बारा टक्के यान्यायानें एकदम नीचठ-रवितोस तेव्हां तुला म्हणावें तरी काय ?

**कुमुधा०**— मित्रा, रागावूं नको. सांगतों इकडे लक्ष दे. हें नाटक परमार्थ बुडविणारें आहे अ-शी तुझी समजूत आहे परंतु वास्तविक तसाप्र-कार नाहीं. अरे ज्यांत परोपकार घडतो तें कृ-त्य परमार्थसबाधक होत नाहीं, साधकच होतें. वेश्यांमध्यें महानंदे सारखीं जीं रत्नें निपजलीं अ-सतील त्यां सही दोषी ठरवावें असें माझ्या म-नांत नाहीं. उलट त्यांच्ये बद्दल माझी पूज्यबुद्धि आहे पण अशा हजारांत पांच मिळतील किंवा नाहीं याची शंकाच आहे. तेव्हा ह्याच्या व ह्या-च्या जारांच्या हिताकरितां मीं हा प्रस्तुतचा यत्न केला आहे वेश्यांची कपट बुद्धि त्यांच्या जारांसच अहित कारक होते असें नाहीं, तर त्यांसही अ-हितकारक होते. परंतु ही गोष्ट त्यांच्या लक्षांत ये-

त नाहीं यामुळें त्यांचेंहि नुकसान होतें. जर त्यांचें नीतीचें आचरण असेल तर त्यापासून परस्परांस सुख होईल. इतरांस जशी नीतीची अवश्यकता आहे त्याप्रमाणें वेश्यांसहि आहे.

**विदु०**— आतां समजलों. नीतिमान जेवढ्या असतील त्यांजबद्दल तुला तिटकारा नाहीं. ही गोष्ट एकाद्या प्रवेशामध्यें घुसडून देता असतास तर तू वेश्यांविषयीं पराङ्मुख आहेस अशी माझी समजूत झाली नसती. बरें असो आतां सांगत्यांचीं वर्तन कसें ठेवावें तें.

**सूत्रधा०**— तूं ज्या महानंदेचें वर्णन करितोस तिच्या प्रमाणें वेश्यांनीं आपलें आचरण ठेवावें म्हणजे झालें. महानंदेचें आचरण कोणत्या प्रकारचें होतें हें सर्वांस विश्रुत आहेच.

**विदु०**— बरें मित्रा आतां मला एवढें सांगकीं, तारा व पुतळाजी ह्यांची पुढें काय अवस्था झाली.

**सूत्रधा०**— उपदंशाच्या विकारानें तारा हाल अपेष्टा होऊन मरण पावली. आणि सर्वसंपत्ती चोरीस जाऊन वृद्धावस्थेंत पुतळाजीस शेवटीं भिक्षा मागून निर्वाह करण्याचा प्रसंग आला. मित्रा हें जें नाटक क-

रून दाखविलें अशा प्रकारच्या गोष्टी जगांत नेहमींच घडतात. पण ह्यापेक्षांही कठीण प्रसंग वेश्यांच्या दुर्वर्तनामुळें उभयतांस भोगावे लागतात. अशीं उदाहरणें शेंकडों दाखवितां येतील. परंतु आजपर्यंत झालेल्या गोष्टीस उपाय नाहीं. तथापि ह्यापुढें तरी वेश्यांनीं नीति स्विकारावी. तसें केल्यास त्यांचें ह्यालोकीं व परलोकीं कल्याण होईल. इतकें सांगून आतां सभे जवळ रजा मागतों.

---

समाप्त.

# विक्रीकरितां तयार असलेलीं नवीन पुस्तकें

| | किं० | ट-हा. |
|---|---|---|
| पुष्पवाण विलास (भाषांतर सहीत.) | ʕ४ | ʕʕ६ |
| द्रव्यमिळविण्याची स्वल्परीति | ʕ१ | „ |
| शेक्सपीयरचें चरित्र | ʕ४ | „ |
| सामुद्रिक लक्षण | ʕ२ | „ |
| हिंदुस्थानीदोहरे | ʕ१ | „ |
| कात्यायनीव्रत कथा (साकीबद्ध.) | ʕ१ | „ |
| जानकीप्रताप (ओंवीबध्द.) | ʕ२ | „ |
| आरोग्यदर्शन भागपहिला. | ʕ८ | „ |
| नीतिपर कविता संग्रह | ʕ१२ | ʕ१ |
| ब्रम्हकर्मसार | ʕ१५ | ० |
| वेदांतबोध | ʕ१२ | ʕ१ |
| पदसंग्रह | ʕ१२ | |
| प्रमिलार्जुननाटक | ʕ१२ | |
| कृष्णार्जुन युध्द नाटक | ʕ१० | „ |
| वेदांतबोध | ʕ१२ | „ |
| हिंदुस्थानी दोहरे | ʕ१ | ʕʕ६ |
| संभाजीचें चरित्र | ʕ१ | „ |
| अकबर बादशहाचें चरित्र | ʕ२ | „ |

| | | |
|---|---|---|
| मुलांस उपदेश (मोडी) | ६२ | ६६ |
| पहिल्या पुस्तकाचे शब्दार्थ व कवितान्वयार्थ | ६२ | 〃 |
| दुसऱ्या पुस्तकाचे शब्दार्थ व कवितान्वयार्थ | ६१६ | 〃 |
| तिसऱ्या पुस्तकाचे शब्दार्थ व कवितान्वयार्थ | ६२६६ | 〃 |
| आशिया व यूरोपखंडाचे भूगोलपत्रक | ६१ | 〃 |
| हिंदुस्थानचें भूगोलपत्रक | 〃 | 〃 |
| मुंबई इलाख्याचें भूगोल पत्रक | 〃 | 〃 |
| रत्नागिरि जिल्ह्याचें भू. प. | 〃 | 〃 |
| धुळाक्षर | 〃 | 〃 |

यांतून कोणतींहि पुस्तकें मागविणारांनीं पत्रें वगैरे व्यवहार **महादेव विनायक केळकर** मुक्काम मालवण जिल्हा रत्नागिरी या पत्यावर ठेवावा. यांतून कोणत्याहि ग्रंथ प्रति घेणारास एक प्रत कमिशन दिली जाते.

# निघतअसतें.

# विचारशील.

## वर्तमानपत्र.

---

हें मालवण येथें प्रतिसोमवारीं निघत असतें. यांत राजकीय व व्यवहारीक विषय येत असतात ह्याची टपाल हांशिला सह किंमत एक रुपया तेरा आणे.

या संबंधीं पत्रव्यवहार **गणेशविश्राम पाटकर** मुक्काम मालवण जिल्हा रत्नागिरी या पत्त्यावर करावा.